॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव प्रतिनिधी दि. ११ - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील केबीसीएनएमयू सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस (KCIIL) च्या आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील संचालक मंडळाची द्वितीय बैठक आज दि. १० सप्टेंबर २०२५ रोजी विद्यापीठाचे कुलगुरु तथा केसीआयआयएलचे अध्यक्ष प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली

या बैठकीत KCIIL संचालक मंडळ सदस्य डॉ. संदिप पाटील, श्री. प्रमोद संचेती, श्री. नितीन बंग, श्री. अनिल काकरिया, श्री. अनिकेत पाटील, श्री. दीपक पाटील, श्री संजय शहा, प्रा. अरुण इंगळे, सीए रवींद्र पाटील, प्रा. आशुतोष पाटील, डॉ. राजेश बी. जवळेकर, कंपनी सचिव श्री राकेश कासार तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नविन खंडारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरचे कंपनी सचिव राकेश कासार यानी सेंटरमार्फत राबविण्यात येणाऱ्या कायदेशीर अनुपालनाविषयी सादरीकरण केले. यानंतर इन्क्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नविन खंडारे यांनी महत्त्वाच्या विषयांवर सादरीकरण करून संचालक मंडळासमवेत सविस्तर चर्चा केली.

यात २०२५-२६ चा कृती आराखडा तसेच दीर्घकालीन शाश्वततेचा आराखडा, CSR व शासकीय योजना यांच्या मदतीने स्टार्टअपसाठी इन्क्युबेशन सुविधांचा विस्तार, मॅटरशिप व इन्व्हेस्टर कनेक्ट संधी वाढविणे, KIEDCS सुदृढ करणे व हब अँड स्पोक मॉडेल द्वारे उद्योग अकॅडेमिया भागीदारी वृद्धिंगत करणे, युवास्पार्क, इनोलॉन्च व मेडिथॉन उपक्रमाद्वारे विद्यार्थी-नेतृत्वाखालील स्टार्टअपस प्रोत्साहन, कृषी-आधारित प्रकल्पांसाठी इन्क्युबेशन सहाय्य वाढविणे, आदिवासी तरुणाच्या उद्योजकीय क्षमतांचा विकास करण्यासाठी विशेष ट्रायबल कोहर्ट राबविणे, संसाधन संकलनासाठी भागीदारी उभारणे, प्रादेशिक उद्योजकता विस्तार व सहयोगाच्या नवीन संधीचा शोध घेणे इत्यादी घटकांचा समावेश होता.

आयोजित बैठकीत संचालक मंडळ सदस्यांनी दिलेले मार्गदर्शन आणि रचनात्मक सूचना KCIIL च्या भविष्यातील दिशा व दृष्टी ठरविण्यास महत्वपूर्ण ठरणार असून नवोपक्रम, संशोधन आणि उद्योजकता यांवर भक्कम लक्ष केंद्रीत ठेवून KCIIL स्टार्टअप कल्पनांना यशस्वी उपक्रमांमध्ये रूपांतरित करणारे सक्षम परिसंस्था तयार करण्यास कटिबद्ध असल्याचे सांगण्यात आले. या प्रसंगी नवनियुक्त संचालकांचे स्वागत इन्क्युबेशन सेंटरमार्फत करण्यात आले.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेअंतर्गत शिक्षणशास्त्र विभागाद्वारे जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी 'माझी मानसिक आरोग्य यंत्रणा' या पोस्टर सादरीकरण उपक्रमाचे आयोजन आज गुरुवार दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आले.

या पोस्टर सादरीकरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य व्यवस्थापनाच्या अनेक पैलूंवर लक्ष केंद्रीत करण्यात आले. ताण-तणावाचे व्यवस्थापन व वेळेचे नियोजन करणे, नकारात्मक विचारांऐवजी सकारात्मक विचारसरणी अंगीकारणे. योग, प्राणायाम, ध्यान व शारीरिक व्यायाम यामुळे मनाची शांती आणि एकाग्रता वाढविणे, तंत्रज्ञानाच्या अति वापरामुळे उद्भवणारे मानसिक ताणतणाव व त्यावर उपाययोजना याविषयी जागरूकता निर्माण करणे, कुटुंबीयांचे पाठबळ, मित्रपरिवाराची साथ आणि समाजातील संवेदनशीलता या घटकांची भूमिका स्पष्ट करणे. आत्महत्येच्या घटना टाळण्यासाठी 'संवाद साधणे', 'मदत मागणे' आणि 'व्यावसायिक समुपदेशन' यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

सदर उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्याशी संबंधित घटक, मानसिक आरोग्यावर परिणाम करणारे विविध घटक, जीवनातील ताणतणाव, संघर्ष, वैफल्य, नैराश्य, संरक्षण यंत्रणा, समायोजन वी विषम समायोजन तसेच मानसिक अयोग्य रक्षणचे उपाय या घटकांवरील माहितीपूर्ण आशय, आकर्षक चित्ररचना आणि घोषवाक्य सादर करून मानसिक आरोग्याविषयी जनजागृती केली.

आंतर विद्याशाखीय अभ्यास प्रशाळेच्या संचालक डॉ. मनीषा इंदाणी अध्यक्षयीय भाषणात सांगितले की, "शैक्षणिक वातावरणात मानसिक आरोग्याची चर्चा होणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी आज दिलेला संदेश समाजासाठी दिशादर्शक

ठरेल. तसेच मानसिक आरोग्य ही केवळ वैयक्तिक बाब नसून कुटुंब, समाज आणि शैक्षणिक वातावरणाशी निगडित जबाबदारी असल्याचा संदेश देण्यात आला. आत्महत्या प्रतिबंधासाठी "मदत मागणे ही कमजोरी नव्हे तर धैर्याची खूण असल्याचे देखील त्या यावेळी म्हणाल्या.

विद्यार्थ्यांच्या पोस्टरचे परीक्षण डॉ. संतोष खिराडे यांनी केले. या पोष्टर सादरीकरण उपक्रमांतर्गत प्रथम पारितोषिक गंगा चौधरी, द्वितीय पारितोषिक अमीला गावित आणि तृतीय पारितोषिक मोनिका लोखंडे यांना घोषित करण्यात आले. या उपक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. रणजित पारधे तर उपक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राध्यापक डॉ. स्वाती तायडे, श्री. संदीप वाघ, श्री. योगेश कोरडेवार तसेच शिक्षकेतर कर्मचारी जयेश पाटील आणि विवेक भावसार यांचे सहकार्य लाभले.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ११ सप्टेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता